


पीसीएमसीच्या वीर अग्निशामकांना 'सेफ इंडिया हिरो प्लस' सन्मान

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | गुरुवार दिनांक 14/08/2025 | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 181 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# दिल्लीत मावळचा डंका खा. श्रीरंग बारणे विजयी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - लोकसभा, राज्यसभा खासदारांच्या गरजा व अपेक्षा लक्षात घेऊन विविध उपक्रम राबविणाऱ्या दिल्लीतील प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या का ॅन्सिटयूशन क्लबच्या निवडणुकीत मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे विजयी झाले. महाराष्ट्रातून बारणे हे एकमेव उमेदवार होते. ते विजयी झाले. सर्वपक्षीयांशी असलेल्या संबंधांचा बारणे यांना या राजकारण, पक्षविरहित असलेल्या निवडणुकीत फायदा झाला.**



लोकसभा, राज्यसभेच्या आजी-माजी खासदारांसाठी का ॅन्सिटयूशन क्लब हा अधिकृत क्लब आहे. लोकसभेचे अध्यक्ष त्याचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. गेल्या अनेक वर्षांपासून या क्लबवर भाजपचे खासदार राजीवप्रताप रुडी यांचे वर्चस्व आहे. सर्व पक्षातील खासदारांशी उत्तम संपर्क असलेलाच उमेदवार या निवडणुकीत निवडून येतो. कॉन्स्टिट्यूशन क्लबच्या 2025 निवडणुकीत कार्यकारी सदस्यांच्या निवडणुकीसाठी 12 ऑगस्ट रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. सचिवपदासाठी राजीवप्रताप रुडी आणि संजीव बालियान यांच्यात लढत झाली. त्यात रुडी विजयी झाले. सदस्यपदाच्या 11 जागांसाठी 14 जणांनी अर्ज भरले होते. महाराष्ट्रातून खासदार श्रीरंग बारणे यांचा एकमेव अर्ज दाखल होता. लोकसभा, राज्यसभेच्या 669 विद्यमान व माजी खासदारांनी मतदान केले. या मतदानासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, राज्यसभेचे विरोधी पक्षनेते, काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकाअर्जुन खर्गे, शत्रुघ्न सिन्हा, स्मृती इराणी, कंगना रणौत यांच्यासह लोकसभेचे विद्यमान व माजी सदस्य, कॉन्स्टिट्यूशन क्लबचे सदस्य असलेले केंद्रीय मंत्री आणि खासदारांनी मोठ्या संख्येने मतदानात सहभाग घेतला. विशेष म्हणजे, यामध्ये महाराष्ट्राचे खासदार सर्वाधिक संख्येने उपस्थित होते. पक्षविरहित असलेल्या या निवडणुकीत खासदार श्रीरंग बारणे मोठ्या मताधिक्याने विजयी झाले. खासदार बारणे म्हणाले, ही निवडणूक पक्षविरहित असते. सर्वच पक्षांतील खासदारांशी असलेल्या संबंधांचा मला फायदा झाला. सर्वांनी विश्वास दाखवून मला क्लबमध्ये काम करण्याची संधी दिली. देशाचे प्रतिनिधित्व करणारे कार्यकारी सदस्य क्लबच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये सक्रिय सहभाग घेतात.

विविध विभागांचे कामकाज पाहतात. महत्त्वाच्या कार्यक्रमांच्या नियोजनात क्लबचे योगदान असते. खासदारांच्या गरजा व अपेक्षा लक्षात घेऊन नवे उपक्रम राबविले जातात. क्लबमध्ये विविध सुखसुविधा असतात. क्लबच्या माध्यमातून वर्षेभर विविध उपक्रम राबविले जातात. पंतप्रधानही या कार्यक्रमात सहभागी होतात.

# नागरिकांच्या कल्पनांनी घडणार पिंपरी चिंचवडचा विकास!

## अर्थसंकल्पात नागरी सहभाग, १५ ऑगस्टपासून देता येणार सूचना

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अर्थसंकल्पात नागरिकांना त्यांचा सक्रिय सहभाग नोंदवता यावा, यासाठी महापालिका गेल्या काही वर्षांपासून उपक्रम राबवत आहे. या उपक्रमांतर्गत अर्थसंकल्प २०२५-२६ मध्ये पुनावळे येथील नव्या रस्त्यांसाठी, चऱ्होलीतील सुधारीत पादचारी मार्गांसाठी निधी देण्यापासून ते रावेतमधील नवीन पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे.

आता अर्थसंकल्प २०२६-२७ मध्ये देखील नागरिकांनी सुचवलेल्या योजनांसाठी त्यांच्या परिसरात वसूल होणाऱ्या मालमत्ता कराच्या १० टक्के निधीची तरतूद करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने नागरिकांना १५ ऑगस्ट २०२५ पासून त्यांच्या सूचना देता येणार आहेत.आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या अर्थसंकल्पासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेला आठ प्रभागांतून २ हजार २७९ नागरिकांच्या सूचना प्राप्त झाल्या होत्या. छाननीनंतर त्यांपैकी ७८६ सूचना स्वीकारण्यात आल्या आणि नागरिकांनी सुचवलेल्या तब्बल ४९९ कामांना निधी देण्यात आला. नागरिकांनी सुचवलेल्या कामांसाठी ९४.८६ कोटी रुपये राखीव निधी ठेवण्यात आला होता.

मात्र महापालिकेने नागरिकांनी सुचवलेल्या सामाजिक कामांना प्राधान्य देताना या कामांसाठी १३८.९८ कोटी रुपयांचा निधी वाटप केला.ड प्रभागाला सर्वात जास्त लाभनागरिकांनी सुचवलेल्या योजनांसाठी त्यांच्या परिसरात वसूल होणाऱ्या मालमत्ता कराच्या १० टक्के



निधीची तरतूद केली जाते. त्यानुसार सर्वात जास्त लाभ ड प्रभागाला झाला आहे.

या प्रभागातील पुनावळे, ताथवडे, वाकड आणि पिंपळे सौदागर परिसरात नागरिकांनी सुचवलेली विविध कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

येथे मुख्य रस्त्यांची कामे, ड्रेनेजची कामे आणि उद्यानांसाठी ४३.८८ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला. ब प्रभागातील रावेत, किवळे या भागातील कामांसाठी २०.६० कोटी रुपयांचा निधी मिळाला.

या निधीत रस्त्यांच्या कामांपासून रावेतमधील नवीन महापालिका शाळेपर्यंतची कामे समाविष्ट आहेत. शहरातील जवळपास सर्वच प्रभागांतून आलेल्या नागरिकांच्या सूचनांमध्ये रस्त्यांची कामे, पादचारी मार्ग, उद्यान सुधारणा, कचरा व्यवस्थापन अशा प्रमुख कामांचा समावेश होता.

तसेच सर्वच प्रभागांत सार्वजनिक सुरक्षेसाठी सीसीटीव्ही बसविणे, थेरगावमध्ये शहरी रस्ता डिझाईन मानकांनुसार पादचारी मार्ग बांधणे आणि पिंपरी गावात रेल्वे उड्डाणपूल विकसित करणे

अशा कामांचाही समावेश होता.नागरिकांच्या सूचनांचा विचार करून आणि कामांचा प्राधान्यक्रम ठरवून अर्थसंकल्प २०२५-२६ मध्ये निधीची तरतूद करण्यात आली आहे.

आता नागरिकांकडून पुन्हा अर्थसंकल्प २०२६-२७ साठी सूचना मागवण्यात येणार असून त्याची सुरुवात १५ ऑगस्ट २०२५ पासून होणार आहे.

# पीसीएमसीच्या वीर अग्निशामकांना ‘सेफ इंडिया हिरो प्लस’ सन्मान

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : देशसेवा, मानवसेवा आणि संकटसमयी जीव धोक्यात घालून कार्य करणाऱ्या वीरांचा गौरव करण्यासाठी “के ई फायर अँड सेफ्टी” या १९९८ पासून कार्यरत अग्रगण्य संस्थेद्वारे प्रतिष्ठित “सेफ इंडिया हिरो प्लस” पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. हा सोहळा मुंबईतील ऐतिहासिक हॉटेल ताज येथे १३ ऑगस्ट २०२५ रोजी पार पडला.**




हा पुरस्कार देशातील उत्कृष्ट अग्निशामक, बचावकर्ते आणि संकटसमयी धाडसी कार्य करणाऱ्या अग्निशमन कर्मचारी यांचा सन्मान करण्यासाठी दरवर्षी दिला जातो. या वर्षीच्या सोहळ्यात पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशामक विभागातील फायरमन दिनेश देविदास इंगळकर, मोशी अग्निशामक केंद्राचे वाहनचालक शांताराम पांडुरंग घारे, मुख्य अग्निशमन केंद्राचे लिडिंग फायरमन, हनुमंत धोंडीबा होले, फायरमन संतोष मधुकर सरोटे, फायरमन विलास राजाराम पाटील यांचा सन्मान करण्यात आला.संतोष मधुकर सरोटे - १५ वर्षे भारतीय नौदलात ‘क्रॅश टेंडर इन्चार्ज’, ‘एअर ट्रॅफिक कंट्रोलर’ आणि ‘क्रॅश टेंडर ड्रायव्हर’ म्हणून जबाबदाऱ्या पार पाडल्या. मागील २१ वर्षे पीसीएमसी अग्निशमन विभागात कार्यरत राहून रासायनिक गळती, पूर, औद्योगिक आपत्ती आणि कोविड काळात जीव धोक्यात घालून सेवा दिली.विलास राजाराम पाटील – १७ वर्षांची भारतीय नौदल सेवा, जहाज व पाणबुडी मोहिमांमध्ये सहभाग, श्रीलंकेत शांती मोहिमेतील योगदान, आणि २००४ पासून अग्निशमन विभागातील कार्याचा उल्लेखनीय वारसा. मोठ्या आगी, बचावकार्य, आणि कोविड काळात नागरिकांच्या सुरक्षेसाठी अग्रभागी राहिले. दिनेश देविदास इंगळकर – १६ वर्षे भारतीय सैन्यात ‘कॉर्प्स ऑफ सिग्नल्स’ मध्ये कार्य, श्रीलंकेत ‘इंडियन पीस कीपिंग फोर्स’ मोहिमेत सहभाग, आणि २००५ पासून पीसीएमसी अग्निशमन विभागात अनेक मोठ्या आगींवर नियंत्रण ठेवत नागरिकांचे प्राण वाचवले.हनुमंत धोंडीबा होले- १५ वर्षे भारतीय नौदलात सेवा करताना श्रीलंकेतील शांती मोहिमेत सहभाग, तसेच विविध ठिकाणी कार्याचा अनुभव. २००५ पासून पीसीएमसी अग्निशमन विभागात लिडिंग फायरमन पदावर कार्यरत राहून S T P टँकमधील कामगार वाचवणे, बोट अपघातातील नागरिकांचे प्राण वाचवणे यांसारखी अनेक धाडसी कामगिरी केली.शांताराम पांडुरंग घारे - ३३ वर्षे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत विविध सेवांमध्ये योगदान. यापैकी ५ वर्षे जकात विभागात, ५ वर्षे ॲम्ब्युलन्स सेवेत आणि २१ वर्षे अग्निशमन विभागात वाहनचालक म्हणून कार्यरत. आपत्कालीन परिस्थितीत वेग, दक्षता आणि समर्पणाने नागरिकांची मदत करत शेकडो जीव वाचवण्यात मोलाची भूमिका बजावली.

# महापालिका शाळेतील श्रावणी पुढील शिक्षणासाठी निघाली जर्मनीला

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कासारवाडी येथील छत्रपती शाहू महाराज इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये शिकणारी विद्यार्थिनी श्रावणी टोनगे हिची निवड जर्मनीतील प्रतिष्ठित युनायटेड वर्ल्ड कॉलेज (UWC) संस्थेच्या रॉबर्ट बॉश कॉलेजमध्ये झाली आहे. येत्या २८ ऑगस्ट २०२५ पासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक सत्रात श्रावणीचा प्रवेश निश्चित झाला आहे. १०० टक्के शिष्यवृत्ती मिळवणारी ती महाराष्ट्रातील एकमेव विद्यार्थिनी आहे.**



महापालिकेच्या शाळेमध्ये दर्जेदार व शिक्षणासाठी पोषक वातावरण असल्याचे श्रावणीच्या निवडीने सिद्ध झाले आहे. दहावी उत्तीर्ण विद्यार्थिनी श्रावणी हिने महापालिकेच्या शाळेतील शिक्षक, जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर यश मिळवले आहे.

श्रावणी आता अकरावी-बारावीच्या शिक्षणासाठी जर्मनीला चालली आहे. तसेच या दोन वर्षांच्या अभ्यासक्रमात ती विज्ञान, गणित, अर्थशास्त्र यासारख्या विषयांचा सविस्तर अभ्यास करणार आहे.

जर्मनीतील प्रतिष्ठित युनायटेड वर्ल्ड कॉलेज (UWC) संस्थेच्या रॉबर्ट बॉश कॉलेजेस या संस्थेमार्फत शिष्यवृत्तीसाठी महाराष्ट्रातून तिची निवड करण्यात आली आहे. दहावीच्या परीक्षेत तिला ९३ टक्के गुण मिळाले आहेत. तिचे वडील खासगी शाळेत शिक्षक आहेत, तर आईदेखील खासगी कंपनीत नोकरी करत आहे.

२८ ऑगस्ट २०२५ पासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक सत्रात श्रावणीचा शिक्षणप्रवास जर्मनी येथून सुरू होणार आहे. युनायटेड वर्ल्ड कॉलेजेस या संस्थेची जगभरात विविध ठिकाणी शाळा व महाविद्यालये आहेत. संस्थेमार्फत शिक्षणासाठी विविध शिष्यवृत्त्या दिल्या जातात. श्रावणीने अनेक शैक्षणिक व सहशालेय स्पर्धांमध्ये भाग घेतला आहे.

तिने शिष्यवृत्ती परीक्षा तसेच हिंदी राष्ट्रभाषा परीक्षा देखील यशस्वीरित्या उत्तीर्ण केली आहे. तसेच, क्रीडा क्षेत्रातही शाळेच्या बास्केटबॉल संघाची कर्णधार देखील होती आणि डिस्कस थ्रो या क्रीडाप्रकारात सुवर्णपदक मिळवले होते.

शिष्यवृत्तीसाठी विविध टप्प्यांवर परीक्षा, चर्चा, मुलाखत आणि उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते. श्रावणीच्या नेतृत्वगुणांना, सामाजिक जाणिवेला आणि शैक्षणिक समतेला या निवड प्रक्रियेत प्राधान्य दिले गेले.

श्रावणीची निवड झाल्यामुळे हे संपूर्ण शहरासाठी आणि महापालिकेच्या शैक्षणिक क्षेत्रासाठी गौरवाचा क्षण आहे. श्रावणीने आपली गुणवत्ता, जिद्द आणि प्रयत्नांच्या जोरावर हे यश मिळवले आहे.

केंद्रित शिक्षणपद्धती आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यांचा मोठा वाटा तिच्या यशात आहे. 'विद्यार्थी गुणवत्तावाढ उपक्रम', विशेष मार्गदर्शन सत्रे आणि शाळेतील प्रोत्साहनात्मक वातावरण यामुळेच श्रावणीला आंतरराष्ट्रीय संधी मिळवता आली आहे.

# घरफोडी करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला अटक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : सिंहगड रस्ता परिसरात वाढत्या घरफोडीच्या घटनांनी त्रस्त झालेल्या नागरिकांना दिलासा देणारी मोठी कारवाई पुणे पोलिसांनी केली आहे. सिंहगड रस्ता पोलिसांनी एका सराईत घरफोडी करणाऱ्या गुन्हेगाराला अटक करून त्याच्याकडून १४ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव रेवण उर्फ रोहन बिरू सोनटक्के (वय २४, सध्या रा. राधानगरी सोसायटी, दिघी रस्ता, भोसरी; मूळगाव – मुरूम, ता. उमरगा, जि. धाराशिव) असे आहे.अधिकच्या माहितीनुसार, २० मे २०२५ रोजी आनंदनगर येथील आशिष अपार्टमेंटमध्ये झालेल्या घरफोडीच्या तपासादरम्यान पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासले. यात काळ्या रंगाचे जॅकेट व हेल्मेट घातलेला एक व्यक्ती रात्री २ ते ५ दरम्यान घरफोडी करताना दिसला.

तपास सुरू असताना ८ ऑगस्ट २०२५ रोजी अंमलदार देवा चव्हाण, राहुल ओलेकर आणि निलेश भोरडे यांना या घटनेबाबत माहिती मिळाली की, संशयित आरोपी दिघी रस्त्यावरील राधानगरी सोसायटीत थांबला आहे. पोलिस उपनिरीक्षक संतोष भांडवलकर यांच्या पथकाने तात्काळ त्या ठिकाणी जाऊन आरोपीला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने पुणे शहर व सिंहगड रस्ता परिसरात गेल्या ६-७ महिन्यांत अनेक घरफोड्या केल्याची कबुली दिली.

दरम्यान, आरोपीकडून ५,७१,१५० रुपयांचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले तर ६ लाख ७० हजार रुपये किमतीची ह्युंदाई 'व्हेन्यू' कार आणि १ लाख ८२ हजार रुपये किमतीचे कार ॲक्सेसरीज व दुरुस्ती साहित्य सापडले आहे, पल्सर मोटारसायकल, बोल्ट कटर, हातोडी, स्क्रू ड्रायव्हर, मास्क आणि हॅन्डग्लोव्ह्ज जप्त केले आहे.

# पिंपरीतील व्यावसायिक गोळीबारप्रकरणी पुजारी गँगचा गँगस्टरला अटक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी- चिंचवड : पिंपरीतील व्यावसायिकावरील गोळीबारप्रकरणी मालमत्ता विरोधी पथकाने सराईत गुन्हेगार रवींद्र भाऊसाहेब घारेला अटक केली आहे. पिंपरीतील व्यवसायिकाची सोनसाखळी हिसकावताना पायावर गोळी झाडली होती. यानंतर घारे फरार झाला होता. भरदिवसा घडलेल्या या घटनेमुळे पिंपरी-चिंचवडमध्ये खळबळ उडाली होती.



सराईत गुन्हेगार रवींद्र भाऊसाहेब घारे हा गँगस्टर रवी पुजारी, सुरेश पुजारी यांच्याशी संबंधित आहे. गेल्या काही महिन्यांपासून त्याला पैशांची चणचण भासत असल्याने त्याने पिंपरीतील व्यावसायिकाला हेरून त्याच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावण्याचा प्रयत्न केला. व्यावसायिकाने प्रतिकार केल्याने घारेने त्याच्या पायावर गोळी झाडली. भरदिवसा घडलेल्या या प्रकरणामुळे पिंपरीत एकच खळबळ उडाली.

गुन्हेगार रवींद्रने हेल्मेट आणि रेनकोट घातला असल्याने तपासात अनेक अडचणी आल्या. अखेर मालमत्ता विरोधी पथकाने सीसीटीव्हीच्या आधारे शोध घेऊन घारेला बेड्या ठोकल्या आहेत.

रवींद्र घारे याच्यावर २५ गंभीर गुन्हे दाखल आहेत. एक हत्या आणि सहा गोळीबार त्याने केलेले आहेत. सध्या तो नवी मुंबईमधील बांधकाम व्यावसायकावरील गोळीबारप्रकरणी आणि मोक्का अंतर्गत फरार होता.

आरोपीकडून १ पिस्तुल, ११ जिवंत काडतुसे, दोन दुचाकी जप्त करण्यात आले आहेत, अशी माहिती सह पोलिस आयुक्त शशिकांत महावरकर, अपर पोलिस आयुक्त सारंग आव्हाड यांनी सांगितली आहे.

ही कामगिरी पोलिस उपायुक्त शिवाजी पवार, सहाय्यक पोलिस आयुक्त विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक विजय ढमाळ यांच्या निदर्शनात करण्यात आली आहे.

# पाईट दुर्घटनेतील मृत भाविकांना भाजपा तर्फे श्रद्धांजली अर्पण

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

खेड तालुक्यातील पाईट जवळील प्रसिद्ध कुंडेश्वर देवस्थान येथे श्रावण महीन्यात भाविक मोठ्या प्रमाणात देव दर्शनासाठी येतात. श्रावणी सोमवार निमित्त पाईट जवळील पापळवाडी मधील जळवपास ३२ ते ३५ महिला भाविक पिकअप गाडीतून दर्शन करुन परत येत असताना उतारावर चालकाचा गाडीवरील ताबा सुटला व गाडी दरीत कोसळली.



यात जावपास ९ ते १० भावीक मृत झाल्या असून उर्वरित भावीक गंभीर जखमी झाले आहेत व त्यांच्यावर हॉस्पिटल मध्ये उपचार सुरु आहेत.या दुर्घटनेत मृत्युमुखी भाविकांना भाजपा चिंचवड काळेवाडी पदाधिकाऱ्यांच्या वतीने चिंचवड गावातील क्रांतिवीर चापेकर चौक येथे भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

तसेच जखमी भाविकांना लवकर बरे होऊन दीर्घायुष्य लाभो अशी मोरया चरणी सामूहिक प्रार्थना करण्यात आली.

भाजपा पिंपरी चिंचवड शहर सचिव मधुकर बच्चे यांनी या श्रद्धांजली सभेत उपस्थितांना दुर्घटने समंधी सविस्तर माहिती दिली. अनेकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

या प्रसंगी भाजपा महाराष्ट्र प्रदेश सदस्य मोरेश्वर शेडगे, भाजपा महाराष्ट्र प्रदेश निमित्त सदस्य महेश कुलकर्णी, भाजपा युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेश सचिव अजित कुलथे, भाजपा ओबीसी मोर्चा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष कैलास सानप, माजी नगरसेवक सुरेश भोईर,शहर सचिव मधुकर बच्चे, प्रभाग स्विकृत सदस्य विठ्ठल भोईर, चिंचवड काळेवाडी मंडल अध्यक्ष हर्षद नढे, शहर उपाध्यक्ष रविंद्र देशपांडे, रविंद्र प्रभुणे, पल्लवी पाठक यांच्यासह भाजपा पदाधिकारी,कार्यकर्ते

तसेच नागरिक उपस्थित होते.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
गुरुवार दिनांक 14/08/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# भूषण पाटीलच्या 'कढीपत्ता' चित्रपटात अनोखी प्रेमकहाणी

## ७ नोव्हेंबरला संपूर्ण महाराष्ट्रात होणार प्रदर्शित

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

आजवर बऱ्याच प्रेमकथांनी रसिकांच्या मनावर गारूड केले आहे. त्यामुळेच निर्माते-दिग्दर्शकही वेगवेगळ्या पार्श्वभूमीवरील प्रेमकथा रसिकांसमोर सादर करत असतात. 'कढीपत्ता' या आगामी मराठी चित्रपटातही प्रेक्षकांना एक अनोखी प्रेमकहाणी पाहायला मिळणार आहे. 'अ बिटरस्वीट लव्ह स्टोरी' अशी या चित्रपटाच्या शीर्षकाला देण्यात आलेली टॅगलाईन उत्सुकता वाढविणारी आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून नव्या दमाचे निर्माता आणि दिग्दर्शकाची जोडी प्रेक्षकांच्या भेटीला एक युथफुल लव्ह स्टोरी घेऊन आले आहेत. ७ नोव्हेंबर रोजी 'कढीपत्ता' हा मराठी चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.युवान प्रोडक्शनची प्रस्तुती असलेल्या 'कढीपत्ता' चित्रपटाची निर्मिती स्वप्नील युवराज मराठे यांनी केली आहे. कथा लेखन व दिग्दर्शन विश्वा यांनी केले आहे.




निर्माते स्वप्नील युवराज मराठे आणि दिग्दर्शक विश्वा यांचा हा पहिलाच चित्रपट आहे. पहिल्याच प्रयत्नांत दोघांनीही एक संगीतप्रधान प्रेमकथा प्रेक्षकांच्या भेटीला आणली आहे. या चित्रपटाचे मोशन पोस्टर प्रदर्शित करण्यात आले आहे. मोशन पोस्टरवर निसर्गरम्य वातावरणात बसलेली नायक-नायिकेची जोडी आहे. चित्रपटात भूषण पाटील मुख्य भूमिकेत आहे, पण नायिका पाठमोरी बसलेली आहे. पाठमोरी बसलेल्या नायिकेच्या मुखातील संवाद खूप मार्मिक आहेत. ती म्हणते की, "ए तुला आठवतं बाबांनी आपल्याला कढीपत्त्याचं महत्त्व सांगितलं होतं. आपण त्याचे गुणधर्म विसरतो आणि फक्त त्याचा उपयोग लक्षात ठेवतो. उपयोग हा क्षणभरासाठी असतो, पण मी तुला एक सांगू का, त्याचा गुणधर्म हा कायमचा राहतो. हाच उपयोग आणि गुणधर्म यातील फरक नक्की काय असतो तेच आपल्याला कळत नाही." या चित्रपटात भूषणची नायिका कोण, हे रहस्य सध्या तरी गुलदस्त्यात आहे.

त्यामुळे चित्रपटाबाबतची उत्सुकता वाढते. लवकरच 'कढीपत्ता'मधील नायिकेचा चेहरा रिव्हील केला जाणार आहे. या चित्रपटाबाबत दिग्दर्शक विश्वा म्हणाले की, या चित्रपटात खऱ्या अर्थाने अनोखी प्रेमकहाणी प्रेक्षकांना पाहायला मिळेल. आजच्या काळातील तरुणाई, त्यांची मते, विचार, भावना, नातेसंबंध, जबाबदाऱ्या आणि एकूणच त्यांच्या भावविश्वाची सुरेख गोष्ट या चित्रपटात आहे. प्रेमकथेला सुरेल गीत-संगीताची जोड देत 'कढीपत्ता'च्या रूपात दर्जेदार निर्मितीमूल्ये असणारा चित्रपट रसिकदरबारी सादर केला आहे.

आजवर अनेक प्रेमकथा आल्या असल्या तरी यातील विषय आणि पैलू कधीही समोर आलेले नाहीत. चित्रपटाला देण्यात आलेली ट्रीटमेंटही खूप वेगळी असल्याने प्रेक्षकांना एक वेगळ्या वाटेवरील चित्रपट पाहिल्याची अनुभूती 'कढीपत्ता' नक्कीच देईल असेही विश्वा म्हणाले. निर्माता म्हणून आमचा हा पहिलाच प्रयत्न असला तरी पदार्पणातच एक आशयघन-संगीतप्रधान कलाकृती तयार केल्याचे समाधान लाभल्याचे निर्माते स्वप्नील मराठे यांचे म्हणणे आहे.या चित्रपटात अक्षय टांकसाळे, संजय मोने, शुभांगी गोखले, गार्गी फुले, आनंदा कारेकर, गौरी सुखटणकर आदी कलाकारांच्याही भूमिका आहेत. याखेरीज आनंद इंगळे आणि चेतना भट पाहुण्या कलाकाराच्या रूपात दिसतील. छायांकन अनिकेत खंडागळे यांनी केले असून वितरणाची जबाबदारी सिनेपोलीस सांभाळणार आहे. संयुक्ता सुभाष या चित्रपटाच्या प्रोजेक्ट हेड, तर विशाल चव्हाण कार्यकारी निर्माते आहेत.

गीतकार मंदार चोळकर, मुकुंद भालेराव, विनू सांगवान यांनी लिहिलेली गीते संगीतकार पद्मनाभ गायकवाड आणि आशिष खांडल यांनी रोहित राऊत, पद्मनाभ गायकवाड, अनन्या वाडकर, साज भट्ट, प्रियांशी श्रीवास्तवा यांच्या आवाजात संगीतबद्ध केली आहेत. पार्श्वसंगीत तन्मय भिडे यांनी दिले असून, संकलन ऋषीराज जोशी यांनी केले आहे. पल्लवी पाटील आणि गार्गी पाटील यांनी वेशभूषा केली असून, किरण सावंत यांनी रंगभूषा केली आहे.

# स्वप्नपूर्तीसाठी उत्तम आरोग्य पाहिजे - डॉ. सुप्रिया गुगळे

## पीसीसीओई मध्ये महिला सक्षमीकरण कार्यशाळा संपन्न

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : महाविद्यालयात शिकत असताना उत्तम करियर करण्याची स्वप्नं सर्व युवक, युवती पाहतात, मात्र ही स्वप्नपूर्ती होण्यासाठी प्रथम सर्वांनी आरोग्य जपले पाहिजे. आरोग्य म्हटले की शरीराचा, मनाचा, आत्म्याचा विचार मनात येतो. तसेच सामाजिक आरोग्य, भावनिक आरोग्य देखील महत्त्वाचे आहे असे मार्गदर्शन डॉ. सुप्रिया गुगळे यांनी केले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी)



आकुर्डी येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग (पीसीसीओई) मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या सहयोगाने गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत आयोजित केलेल्या महिला सक्षमीकरण कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. गुगळे बोलत होत्या. यावेळी मानसिक आरोग्य प्रशिक्षक डॉ. मानसी सोंगिरकर - बोराडे तसेच डॉ. जी. एन. कुलकर्णी, अधिष्ठाता डॉ. एस. यु. भंडारी, आयसीसीचे उपाध्यक्ष डॉ. व्हि. वाय. भालेराव आदी उपस्थित होते. डॉ. गुगळे यांनी सांगितले की, उत्तम आरोग्यासाठी नियमितपणे व्यायाम केला पाहिजे. तसेच डोळे, तळपाय, कानाची पाळी यांना हलक्या हाताने तेल लावून मसाज केला पाहिजे. निसर्गात फिरणे हे देखील लाभदायक असते. मानसिक आरोग्य प्रशिक्षक डॉ. मानसी सोंगीरकर बोराड यांनीही महिलांचे आरोग्य, जीवन संतुलन, निर्णय घेण्याची क्षमता या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. वृषाली भालेराव यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.